लेखा विभाग

वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/०२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/२०१५
३) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय पिंपळेसौदागर यांच्याकडील दि.१५/१०/२०२० चे पत्र
४) मा.लेखाधिकारी यांचेकडील पत्र क्र.११२४/२०१६दि.१०/०९/२०२० घरबांधणी अग्रीम नाहरकत प्रमाणपत्र,
५) दि.२६/१०/२०२० चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिक
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/५२६/२०२०
दि.२६/१०/२०२०

विषय – नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.
श्रीम.बैरागी पद्मावती देवीदास (सहा.शिक्षिका)
सं.क्र.५८०२

आदेश,

श्रीम.बैरागी पद्मावती देवीदास (सहा.शिक्षिका) ह्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहा.शिक्षक या पदावर माध्यमिक शिक्षण विभागात दि.०८/०३/१९८४ रोजी रूजू झालेले आहेत. श्रीम.बैरागी पद्मावती देवीदास यांची जन्म तारीख १५/१०/१९६२ अशी असून त्यांच्या वयास दिनांक-१४/१०/२०२० रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्रीम.बैरागी पद्मावती देवीदास यांना ३१/१०/२०२० रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमाननुसार मध्यानोत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्रीम.बैरागी पद्मावती देवीदास यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच श्रीम.बैरागी पद्मावती देवीदास यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज, घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज, संगणक कर्ज,घर दूरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम,कामगार कल्याण कर्ज तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही व इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेत.भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम श्रीम.बैरागी पद्मावती देवीदास यांना मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील.

श्रीम.बैरागी पद्मावती देवीदास यांना सेवासातत्य आदेश क्र.शिक्षण/०१/कावि/२८७/१९८६ दि.१५/०३/१९८६ अन्वये देण्यात आलेचे त्यांच्या मुळसेवानोंद पुस्तकाची तपासणी केली असता दिसुन येत आहे.परंतु श्रीम.बैरागी यांना माध्य/शि/०१/कावि/५२४/२०२० दि.१६/१०/२०२० अन्वये त्यांना सेवासात्यत देताना संबधीत संस्थेतील पैसे मनपा कोषागरात भरलेल्या पावत्या सादर करणेकामी कळविणेत आलेले होते. तरी श्रीम.बैरागी यांनी आजअखेर पावत्या पैसे भरलेल्या पावत्या सादर केल्या नाहीत.

श्रीम.बैरागी पद्मावती देवीदास यांना सेवासात्यत लाभ न देता मनपा माध्यमिक शिक्षण विभागातील रूजु दि.०८/०३/१९८४ पासुन सेवानिवृत्तीला ग्राह्य धरणेत यावा,तसेच श्रीम.बैरागी पद्मावती देवीदास (सहा.शिक्षिका) माध्यमिक विदयालय पिंपळेसौदागर यांना दि. १४/१०/२०२० रोजी दि.१४/१०/२०२० रोजी वयाची ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने नियत वयोमानानुसार दि.३१/१०/२०२० रोजी महापालिका सेवेतून मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणेत मान्यता देण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद श्रीम.बैरागी पद्मावती देवीदास (सहा.शिक्षिका) संगणक क्र. ५८०२ यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,

श्रीम.बैरागी पद्मावती देवीदास (सहा.शिक्षिका)
माध्यमिक विद्यालय पिंपळेसौदागर

प्रत:- १) लेखा शाखा
२)प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय पिंपळेसौदागर
२/- पुढील कार्यवाहीसाठी

Scanned with CamScanner